# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 October 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १३ ऑक्टोबर २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान–मराठवाड्यातल्या तीन उद्योगांना सुवर्णपदक
- छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड आणि परभणी जिल्हा परिषदेची आरक्षण सोडत जाहीर
- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला महाविकास आघाडीत सामावून घेण्यास काँग्रेसचा विरोध
- वेस्ट इंडीजविरूद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारत विजयापासून अवघ्या ५८ धावा दूर

आणि

- नैऋत्य मौसमी पावसाचा महाराष्ट्रातून परतीचा प्रवास पूर्ण–येत्या १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान राज्यात वादळी पावसाची शक्यता

****

महाराष्ट्राला उद्योग क्षेत्रात कायमस्वरूपी प्रथम क्रमांकावर ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. गेल्या दोन वर्षांसाठीचे महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कार, आज मुंबईत सामंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. दावोस, जर्मनी, जपान यासारख्या परदेश दौऱ्यांतील कराराद्वारे महाराष्ट्रात विक्रमी गुंतवणूक वाढल्याचं सांगत या सामंजस्य कराराच्या ८० टक्के अंमलबजावणी करणारं महाराष्ट्र हे देशात पहिलं राज्य असल्याचं त्यांनी सांगितलं. परभणीच्या एका उद्योगाला तर छत्रपती संभाजीनगरच्या दोन उद्योगांना या पुरस्कार सोहळ्यात सुवर्ण पदक देऊन गौरवण्यात आलं. लातूर

सह, रत्नागिरी, नागपूर, आणि गडचिरोलीच्या जिल्हाधिकाऱ्यांना निर्यात वाढीसाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आलं.

****

विभागात छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड आणि परभणी जिल्हा परिषदेची आरक्षण सोडत आज काढण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या एकूण ६३ जागांपैकी ३५ जागा सर्वसाधारण गटासाठी राखीव असून, यातल्या १७ जागा महिलांसाठी आरक्षित झाल्या आहेत. आठ जागा मागास प्रवर्गासाठी तर नऊ जागा मागास प्रवर्ग महिलांसाठी राखीव, अनुसूचित जातीसाठी चार तर अनुसूचित जाती महिलांसाठी चार जागा राखीव, अनुसूचित जमातीसाठी एक, तर अनुसूचित जमाती महिलांसाठी दोन जागा आरक्षित झाल्या आहेत. या सोडतीवर १४ ते १७ ऑक्टोबर दरम्यान सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकाऱ्यांकडे हरकती तसंच सूचना दाखल करता येतील.

****

नांदेड जिल्हा परिषदेच्या ६५ गटांसाठी आणि १२० पंचायत समिती गणासाठी आज आरक्षण प्रक्रिया पार पडली. जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या प्रक्रियेची जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी माहिती दिली.

**बाईट – राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी, नांदेड**

****

बीड जिल्हा परिषदेच्या ६१ पैकी सोळा जागांचे आरक्षण सोडत आज काढण्यात आली. या जागा इतर मागास वर्ग ओबीसी साठी राखीव असून, त्यापैकी आठ जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. पंचायत समितीच्या गणांची आरक्षण सोडतही आज काढण्यात आली.

****

परभणी जिल्हा परिषदेची आरक्षण सोडत काढण्यात आली. यात अनुसूचित जातीसाठी सात, मागास प्रवर्गासाठी चौदा, सर्वसाधारण महिलांकरिता सोळा गट आरक्षित करण्यात आले तर सोळा गट खुल्या गटाकरीता निश्चित करण्यात आले. जिंतूर तालुक्यातील आडगांव बाजार हा गट अनुसूचित जमातीसाठी आरक्षित करण्यात आला आहे.

****

राज्यात सांगली, नाशिक, नंदूरबार आणि धुळे जिल्हा परिषदेची आरक्षण सोडतही आज पार पडली.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला महाविकास आघाडीत सामावून घ्यायला काँग्रेसनं विरोध केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईत काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यात मुंबई महापालिकेची निवडणूक एकट्यानं लढवण्याची मागणी नेत्यांनी एकमतानं केली. कुठल्याही जागेवर मैत्रीपूर्ण लढत करण्याचा काँग्रेसचा विचार नसल्याचं मुंबई प्रदेशाध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी या बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. मनसेच्या युतीसंदर्भात पक्ष श्रेष्ठींना भूमिका कळवणार असल्याचं काँग्रेस नेत्यांनी सांगितलं.

****

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रं आणि व्हीव्हीपॅट यंत्राच्या तपासणीचा पहिला टप्पा पूर्ण झाल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. देशातल्या सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ही यंत्रं विधानसभा मतदारसंघाच्या स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आली.

दरम्यान, निवडणूक आयोगानं आज सात राज्यांमधील आठ विधानसभा जागांच्या पोटनिवडणुकांसाठी अधिसूचना जारी केली. यामध्ये जम्मू –काश्मीरमधील बडगाम आणि नागरोटा, राजस्थानमधील अंता, झारखंडमधील घाटशिला, तेलंगणातील जुबली हिल्स, पंजाबमधील तरणतारण, मिझोरममधील दंपा आणि ओडिशातील नुआपाडा या जागांचा समावेश आहे.

****

या वर्षीचा अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार नेदरलँड्सचे अर्थतज्ज्ञ जोएल मोकिर, फ्रान्सचे अर्थतज्ज्ञ फिलिप अघियन आणि कॅनडाचे अर्थतज्ज्ञ पीटर हॉविट यांना जाहीर झाले आहेत. नवोपक्रम आणि आर्थिक विकासावरील त्यांच्या अभूतपूर्व कार्यासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

****

उत्पादन–चलित अर्थव्यवस्थेच्या मार्गानेच भारत विकसित राष्ट्र बनू शकतो, असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. देशात शालेय स्तरावरील हॅकेथॉन स्पर्धा, विकसित भारत बिल्डेथॉन २०२५चं उद्घाटन करताना ते आज

बोलत होते. विकसित राष्ट्र बनण्यासाठी भारताला स्पष्ट दृष्टिकोन, प्रगत तंत्रज्ञान आणि आयटी-चालित उपायांची आवश्यकता असून, येत्या काळात विद्यार्थी हे उपाय तयार करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बिल्डेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचं अभिनंदन करताना प्रधान म्हणाले –

**बाईट – केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान**

तीन लाखांहून अधिक शाळा आणि २५ लाखांहून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांनी या बिल्डेथॉनमध्ये व्हर्च्युअल पद्धतीने भाग घेतला आहे. शिक्षण मंत्रालयाने अटल इनोव्हेशन मिशन आणि नीती आयोगाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या देशव्यापी उपक्रमात शाळा आणि शिक्षकांना इयत्ता ६ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य दाखवण्यासाठी सक्षम करण्यासाठी आमंत्रित केलं आहे. यावर्षीची स्पर्धा, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या चार संकल्पनांवर आधारित आहे. या स्पर्धेतल्या, राष्ट्रीय स्तरावरील दहा, राज्यस्तरावरील १०० आणि जिल्हास्तरावरील एक हजार विजेत्यांना एकंदर एक कोटी रुपयांची पारितोषिकं वितरीत करण्यात येतील.

****

रेल्वे पोलीस दलातील पदभरती यापुढे कर्मचारी निवड आयोगाद्वारे करण्यात येणार असल्याची घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. गुजरातमध्ये वलसाड इथं रेल्वे पोलीस दलाच्या एकेचाळीसाव्या स्थापना दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते आज बोलत होते. यावेळी रेल्वे पोलीस दलातील विविध उपक्रमांची वैष्णव यांच्या हस्ते सुरूवात करण्यात आली. रेल्वे पोलीस कर्मचाऱ्यांना आधुनिक डिजिटल आणि ड्रोन प्रशिक्षण देण्याची घोषणा तसंच दिवाळी आणि छट पूजेसाठी १२ हजार विशेष रेल्वे गाड्या चालवणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

****

हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाच्या अमृतमहोत्सवानिमित्त २०वं विभागीय अधिवेशन आज मुंबईत पार पडलं. या दोन दिवसीय अधिवेशनात राज्याच्या पर्यटन क्षेत्राला जागतिक ओळख मिळण्याच्या दृष्टीनं चर्चा झाली. यावेळी पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे

यांच्यासह पर्यटन क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सिंधुदुर्ग इथल्या नियोजित पाण्याखालील पर्यटन प्रकल्पाचं यावेळी अनावरण करण्यात आलं.

****

क्रिकेट

वेस्ट इंडीजविरूद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारत विजयापासून अवघ्या ५८ धावा दूर आहे. आज वेस्ट इंडीजचा दुसरा डाव ३९० धावांवर आटोपला. कुलदीप यादव आणि जसप्रीत बुमराहने प्रत्येकी तीन गडी बाद केले, मोहम्मद सिराजने दोन, तर रविंद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

पाहुण्या संघाने दिलेल्या १२१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल आठ धावा करून तंबूत परतला. आजचा खेळ थांबला तेव्हा, के एल राहूल २५ आणि साई सुदर्शन ३० धावांवर खेळत होते.

****

नैऋत्य मौसमी पावसाचा महाराष्ट्रातून परतीचा प्रवास आज पूर्ण झाला. आता फक्त दक्षिण भारत आणि ओडिशातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू आहे. दरम्यान, राज्यात येत्या १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात वातावरण ढगाळ तसंच वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

****

शेतकऱ्यांना 'मिल्क टू सिल्क' या व्यवसायांकडे वळवण्यासाठी कृषी विभागानं उपाययोजना राबवाव्या, असे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. 'आत्मा' नियामक मंडळाची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. २०२५-२६ साठी जिल्ह्यात कृषी विस्तार सुधारणा सहाय्य कार्यक्रमासाठी २ कोटी ३६ लाख ४७ हजार रुपयांच्या आराखड्यास तसंच जिल्ह्यात १५ ठिकाणी ग्रामस्तरीय माती परिक्षण प्रयोगशाळा स्थापन करण्यासही या बैठकीत मान्यता देण्यात आली. जिल्ह्यात नैसर्गिक, सेंद्रीय शेती क्षेत्रात वाढ करण्यासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याच्या सूचनाही स्वामी यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

****